**दोन शब्द...**

महाराष्ट्रातील खादी व ग्रामोद्योग विकासासाठी महाराष्ट्र शासनाने राज्य विधान मंडळाच्या कायदयानुसार सन १९६२ मध्ये मंडळाची स्थापना केली. ग्रामीण भागातील ग्रामीण कारागिर बलुतेदार यांच्या उदयोगांना प्रोत्साहन देऊन त्यास स्थैर्य प्राप्त करुन देणे हे मंडळाचे प्रमूुख उदिष्ठ आहे. जेव्हापासुन मंडळाची स्थापना झाली आहे तेव्हापासुन मंडळाने खेडयापाडयातील ग्रामीण कारागिर/ग्रामीण बेरोजगार यांना राज्य शासनाच्या आणि केंद्रिय खादी ग्रामोद्योग आयोगाच्या विविध योजनांव्दारे स्वयंरोजगार प्राप्त करुन देण्यासाठी मंडळ सहकार्य करीत आहे. महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ हे ग्रामीण उद्योग टिकुन रहाण्यासाठी उद्योजकांना आवश्यक तो वित्त पुरवठा, तांत्रिक सहाय्य आणि उत्पादित मालास बाजारपेठ उपलब्ध करुन देण्यासाठी सतत प्रयत्नशील आहे.त्याचाच एक भाग म्हणुन ग्रामीणकारागिरांनी उत्पादित केलेल्या उत्पादनास बाजारपेठ मिळावी, सदर उत्पादनाला प्रसिध्दी प्राप्त व्हावी म्हणून मंडळ विशेष प्रयत्न करीत असते. त्याकरीता मंडळामार्फत राज्यात विविध ठिकाणी प्रदर्शने कारागिर मेळावे ,भरविण्याचे प्रयत्न केले जात आहेत.

मंडळाला लागणा-या प्रशासकीय व इतर विकासात्मक आर्थिक बाबीकरीता शासन, सहकार खाते,नाबार्ड,जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅका व विविध वित्तीय संस्थानी भरीव सहकार्य दिले आहे.

मंडळ यापुढेही सातत्याने प्रगती करुन राज्यातील ग्रामीण भागात मोठया प्रमाणात रोजगार निर्मिती करण्याचे काम करीत राहील.

मंडळाच्या योजना/कार्यक्रमाबध्दल प्रकाशित केलेल्या नागरीकांची सनद यामध्ये काही सुचना पुढे आल्यास त्यांचे मंडळ स्वागतच करील.

धन्यवाद.

मुख्य कार्यकारी अधिकारी

महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ,मुंबई

२

**नागरिकाची सनद**

**महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ**
**मुख्य कार्यालय,मुंबई**

**मंडळाची स्थापना**

महाराष्ट्रात खादी व ग्रामोद्योगाना प्रोत्साहन देऊन,त्यांचे संघटन विकास व विनियमन करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाची स्थापना मुंबई खादी व ग्रामोद्योग अधिनियम १९६० (सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक १९ नुसार) करण्यांत आली आहे.

**उददेश**

ग्रामीण भागातील गरजू लोकांना रोजगार पुरविणे,कारगिर,उद्योजक,बलुतेदार यांच्या उद्योगाचे स्थैर्य,स्वयंरोजगारांच्या क्षेत्राची व्यापक प्रमाणात वृध्दी,कारागिरांना कच्चा माल पुरवठा,कारागिरांचे तांत्रिक कौश्यल्य वाढविणे,यासाठी निवडक ग्रामोद्योगांचे प्रशिक्षण,खादी ग्रामोद्योगाच्या विकासास पोषक असे धोरण ठरविण्याबाबत शासनाशी प्रभावी संपर्क स्थापन करणे व स्थानिक साध संपत्तीचा वापर करुन ग्रामीण भागातील उद्योजक,सुशिक्षित बेरोजगार,कारागिर यांना स्थानिक ठिकाणी रोजगार उपलब्ध करुन देणे हा मंडळाचा उददेश आहे.

## मंडळाची रचना

मंबई खादी व ग्रामोद्योग अधिनियम १९६० च्या (सन १९६० चा मंबई अधिनियम क्रमांक १९) कलम ४ (१) व (२) मधील तरतुदीनुसार शासनाकडुन मंडळावर अध्यक्ष व सदस्याची नियुक्ती करण्यांत येते. महाराष्ट्र शासनाने ज्या व्यक्ती खादी ग्रामोद्योगाशी निगडीत आहेत व ज्यांना खादी ग्रामोद्योगांच्या कामांचा अनुभव आहे अशा अशासकीय किमान ५ व कमाल ७ सदस्यांची नियुक्ती मंडळावर करण्यांत येते. मंडळाचे सदस्य सचिव म्हणुन मुख्य कार्यकारी अधिकारी हे काम पहातात. भारतीय प्रशासन सेवेतील अधिकारी मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांची नियुक्ती शासनाकडून केली जाते.

## जिल्हा समिती

ग्रामीण क्षेत्रामध्ये अधिक परिणामकारक प्रभाव पाडण्यासाठी राज्यातील प्रत्येक जिल्हयामध्ये जिल्हा समितीची स्थापना केली जाते. त्यामध्ये राज्य शासनाच्या मान्यतेने मंडळाने नेमावयाच्या एका अशासकीय व्यक्तीची 'सभापती, ' म्हणुन नियुक्ती करण्यांत येते.जिल्हा समिती सदस्य असतात या व्यतिरिक्त तीन अशासकीय व्यक्ती या पैकी एक तरी व्यक्ती अनसुचित जाती, जमाती,विमुक्त जाती किंवा भटक्या जमाती यापैकी असेल आणि त्याच्यापैकी एक तरी व्यक्ती स्त्री सदस्य असेल, जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण विभागाचे सभापती, जिल्हा मध्यावर्ती बॅकेचे अध्यक्ष, जिल्हा लिड बॅंकेचे प्रतिनिधि असे तीन सदस्य, जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था,महाव्यवस्थापक/जिल्हा उद्योग केंद्र,जिल्हा समाज कल्याण अधिकारी असे तीन सदस्य व मंडळाचे जिल्हा ग्रामोंद्योग अधिकारी हे सदस्य सचिव म्हणून काम पहातात.

## परिषद

मंडळाच्या कामात मदत करण्यासाठी राज्य शासनाकडून राज्य स्तरावर मंडळ परिषदेची स्थापना केली जाते. या परिषदेमध्ये मंडळाचे अध्यक्ष व सदस्य,जिल्हा समितीचे अध्यक्ष,राज्य शासनाने नियुक्त केलेल्या कमाल ४ व्यक्तीचा समावेश आहे, परिषदेची बैठक किमान त्रैमासिक व्हायला पाहिजे. अशी तरतुद आहे.

## मंडळाची आरस्थापना

मंडळाचे मुख्य कार्यालय मुबई येथे असुन प्रशासकीय कामे व्दिस्तरीय स्वरुपात असतात. पहिलास्तर राज्यस्तर तर दुंसरास्तर जिल्हास्तर त्यानुसार राज्यस्तरावर मुंबई येथे मंडळाचे प्रधान कार्यालय आहे तर व्दितीय स्तरावर महाराष्ट्राच्या प्रत्येक जिल्हयात जिल्हा स्तरावर जिल्हा कार्यालय असुन त्याचे जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी हे प्रमुख म्हणुन काम पहातात. मंडळाच्या आस्थापनेवर एकुण १२३९ एवढी पदे मंजुर असुन त्यामध्ये वर्ग -१ चे ७ अधिकारी,वर्ग-२ चे २६ अधिकारी वर्ग-३ चे ८०५ कर्मचारी व वर्ग-४ चे ३९१ कर्मचारी आहेत. या कर्मचा-यांपैकी कर्मचारी मुख्य कार्यालय,मुबई येथे कार्यरत असुन उर्वरित कर्मचारी जिल्हा कार्यालयात कार्यरत आहेत. जिल्हा कार्यालयात काम करण्यासाठी जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी, सहा.जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी,लेखापरिक्षक,ज्येष्ट औद्योगिक पर्यवेक्षक,औद्योगिक पर्यवेक्षक,ज्येष्ठ सहाय्यक,कनिष्ठ सहाय्यक,शिपाई असे कर्मचारी असतात. तसेच प्रत्येक तालुका पातळीवर विविध कार्यकारी सहकारी ग्रामोद्योग संघाचे कार्यालय असुन त्या संघाचे काम महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोद्योग मंडळाच्या प्रशासकीय नियत्रंणाखाली व मार्गदर्शनाखाली सुरु आहे. या संघाचे काम करण्यासाठी सचिव व सहाय्यक सचिव असे दोन कर्मचारी कार्यरत आहेत.


जिल्हा सतरावरील मंडळ रचना
जिल्हा समिती अध्यक्ष
व समिती सदस्य
जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी
जिल्हा कचेरी प्रमुख व नियत्रण अधिकारी
लेखाविभाग
विकास विभाग
जिल्हा लेखापरिक्षक -१
जिल्हास्तर
तालुकास्तर
ज्येष्ठ सहाय्यक -१
सहा.जि.ग्रा.अ. -१
.सचिव-१
सहा तथा टंकलेखक-२
ज्येष्ठ पर्यवेक्षक -१
सहा सचिव -१
शिपाई -२
औ.पर्यवेक्षक - ४

# महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ

मंडळाची सर्वसाधारण माहिती

| | |
|---|---|
| कार्यालयाचे नाव | महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ |
| पत्ता | १९/२१, मनोहरदास रस्ता, फोर्ट, मुंबई ४०० ००१ |
| कार्यालय प्रमुख | मुख्य कार्यकारी अधिकारी |
| शासकीय विभागाचे नाव | महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ |
| मंत्रालयातील कोणत्या खात्याच्या अधिनस्त | उद्योग, उर्जा व कामगार विभाग व सहकार व वस्त्रोद्योग विभाग |
| कार्यक्षेत्र | महाराष्ट्र राज्य |
| भौगोलिक | महाराष्ट्र राज्य |
| कार्यानुरुप | महाराष्ट्र राज्य |
| विशिष्ट कार्य | सेवा (ग्रामीण भागात स्वयंरोजगाराने व्यापक प्रमाणात संधी निर्माण करुन ग्रामीण विक ास ) |
| विभागाचे ध्येय/धोरण | उद्योग,उर्जा व कामगार विभागाच्या अधिनस्त असून, त्यांनी सोपविलेल्या सर्व जबाबदा-यांचे पालन (विस्तृत टिपणी सोबत आहे) |
| सर्व संबंधीत कर्मचारी | सूची सोबत जोडली आहे (परिशिष्ट २) |
| कार्य/कामाचे विस्तृत स्वरुप | विस्तृत टिपणी |
| इमारती व जागेचा तपशील | मुख्य कार्यालयाची इमारत १९/२१, मनोहरदास रस्ता, फोर्ट, मुंबई येथे आहे. |
| कार्यालयीन दुरध्वनीक्रमांक व वेळा | परिशिष्ट-२/सकाळी ९.४५ ते सायं. ५.३० पर्यंत मुख्य कचेरी येथे जिल्हा व तालुकास्तरावर १०-०० ते सायंकाळी ५.४५ पर्यंत |
| साप्ताहिक सुटटी | रविवार व महिन्याचा दुसरा व चौथा शनिवार |

# महाराष्ट्र  राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ,
# जिल्हा कार्यालयाचे पत्ते/भ्रमणध्वनी क्रमांक व दुरध्वनी क्रमांक

| | | | |
|---|---|---|---|
| १ | **मुख्य कार्यालय**<br>**श्री.तानाजी सत्रे**<br>मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ,<br>१९/२१, मनोहरदास रस्ता, फोर्ट,<br>मुंबई ४०० ००१, फोन नं. २२६१७६४१-४२-४३<br>९२२५६२९००० | ६ | श्री.व्ही.एन.तायडे,<br>उप मुख्य कार्यकारी अधिकारी,अर्थ,/उदयोग<br>महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ,<br>१९/२१, मनोहरदास रस्ता, फोर्ट,<br>मुंबई ४०० ००१, फोन नं. २२६१७६४१-४२-४३/९२२५६२९००५ |
| २ | श्री.<br>अर्थ सल्लागार व मुख्य लेखाधिकारी,<br>महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ,<br>१९/२१, मनोहरदास रस्ता, फोर्ट,<br>मुंबई ४०० ००१, फोन नं. २२६१७६४१-४२-४३ | ७ | श्री.बी.जी.धनु,<br>सहा लेखा व लेखा परिक्षण अधिकारी,<br>महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ,<br>१९/२१, मनोहरदास रस्ता, फोर्ट,<br>मुंबई ४०० ००१, फोन नं. २२६१७६४१-४२-४३/९२२५६२९०११ |
| ३ | श्री.पी.एम.पवार,<br>लेखा व लेखा परिक्षण् अधिकारी,<br>महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ,<br>१९/२१, मनोहरदास रस्ता, फोर्ट,<br>मुंबई ४०० ००१, फोन नं. २२६१७६४१-४२-४३/९२२५६२९००३ | ८ | श्रीमती.पी.बी.माने,<br>सहा मुख्य कार्यकारी अधिकारी,सह/सांखिकी,<br>महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ,<br>१९/२१, मनोहरदास रस्ता, फोर्ट,<br>मुंबई ४०० ००१, फोन नं. २२६१७६४१-४२-४३/<br>९२२५६२९००९ |
| ४ | श्री.अरुण शिंदे,<br>उप मुख्य कार्यकारी अधिकारी आस्थापना/प्रशासन,<br>महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ,<br>१९/२१, मनोहरदास रस्ता, फोर्ट,<br>मुंबई ४०० ००१, फोन नं. २२६१७६४१-४२-४३/<br>९२२५६२९००१ | ९ | श्री.व्ही.व्ही.सोनपराते,<br>सहा मुख्य कार्यकारी अधिकारी,अर्थ/उदयोग,<br>महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ,<br>१९/२१, मनोहरदास रस्ता, फोर्ट,<br>मुंबई ४०० ००१, फोन नं. २२६१७६४१-४२-४३/<br>९२२५६२९०२१ |

| | | | |
|---|---|---|---|
| ५. | श्री.एन.झेड.ठाकरे,<br>उप मुख्य कार्यकारी अधिकारी,सह/सांख्यिकी,<br>महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ,<br>१९/२१, मनोहरदास रस्ता, फोर्ट,<br>मुंबई ४०० ००१, फोन नं. २२६१७६४१-४२-४३/९२२५६२९००४ | १० | श्री.<br>सहा मुख्य कार्यकारी अधिकारी,आस्था/प्रशासन,<br>महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ,<br>१९/२१, मनोहरदास रस्ता, फोर्ट,<br>मुंबई ४०० ००१, फोन नं. २२६१७६४१-४२-४३/ |
| | **जिल्हा कार्यालये** | | |
| १ | श्री. एस.के.केंजळे,<br>जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी,<br>महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ,<br>लक्ष्मी विष्णू सदन,महर्षी कर्वे रोड,<br>जिल्हा-ठाणे ४०० ६०१.<br>फोन नं. २५३६६०७५/९२२५६२९०१२ | ७ | श्री. एन.बी.गायकवाड,<br>जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी,<br>महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ,<br>नंदूरबार प्रशासकीय इमारत, दुसरा मजला, गाळा क्र.२२२-अ,जिल्हाधिकारी कार्यालय, नंदूरबार.<br>फोन नं. २१००५३/९२२५६२९०१९ |
| ३ | श्री. आर. एस. सुरुंग,<br>जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी<br>महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ,<br>बी.डी.ओ.क्वार्टस समोर,जेल रोड<br>रत्नागिरी-४१५ ६१२,<br>फोन नं. २२२३७९/९२२५६२९०१४ | ९ | श्री. एन. पी. कथले,<br>जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी<br>महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ,<br>जिल्हा उद्योग केंद्र,महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रीक बोर्ड जवळ, स्टेशन रोड,जिल्हा-अहमदनगर<br>पिन ४१४ ००१.<br>फोन नं. २३५३४१०/९२२५६२९०२० |
| ४ | श्री. आर. ए. बुचडे,<br>जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी,<br>महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ,<br>शासकीय बॅरॅक्स,तहसिलदार कार्यालया जवळ एस.डी.डी.३१/२-अ,<br>मु.पो.ता.कुडाळ,जिल्हा-सिंधुदुर्ग ४१६८१२,<br>फोन नं. २२२२२०/९२२५६२९०१५ | १० | श्री. आर.एन.मोरे,<br>जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी,<br>महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ,<br>२४ ब मुंबई-पुणे रस्ता,शासकीय दुध डेअरी समोर पुणे-३, फोन नं. २५८११८५९/९२२५६२९००७ |
| ५ | श्री. एस. जी. हनुवते, | ११ | श्रीमती.व्ही.डी.पाटील जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी, |

| | | | |
|---|---|---|---|
| | जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी<br>महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ,<br>शासकीय आय.आय.टी. जवळ, उद्योग भवन, सातपूर,जिल्हा-नाशिक.<br>फोन नं. २३५२७३७/९२२५६२९०१६ | | महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ,<br>जिल्हा उद्योग केंद्र,एम.आय.डी.सी.कपाऊंड,<br>प्लॉट नं.ए.१३,जिल्हा-सातारा-४१५ ००२.<br>फोन नं. २२४६०१६/९२२५६२९०२३ |
| ६ | श्री. आर.सी.रामोळे,<br>जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी<br>महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ,<br>जिल्हा उद्योग केंद्र,जमनागिरी रोड, फॉरेस्ट आफीस जवळ, जिल्हा-धुळे.<br>फोन नं. २२४६२९२/९२२५६२९०१७ | १२ | श्री. आर. एम. नारखेडे,<br>जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी<br>महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ,<br>मु.पो.विश्रामबाग,ता.मिरज,उद्योग भवन<br>जिल्हा-सांगली.<br>फोन नं. २६७११३०/९२२५६२९०२५ |
| १३ | श्री.बी.बी.जगताप,<br>जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी<br>महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ,<br>जिल्हा उ्द्योग केंद्र, होटगी नाका किनारा हॉटेल समोर, जिल्हा सोलापूर पिन ४१३ ००३<br>फोन नं. २६००१२८/९२२५६८९०२८ | २१ | श्री. एम.व्ही.मेहेर,<br>जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी<br>महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ,<br>जिल्हा उद्योग केंद्र,सेंट्रल जेल समोर<br>जिल्हा-उस्मानाबाद,<br>फोन नं. २२२३०१/९२२५६२९०३१ |
| १४ | श्री.एस.पी.जोंजाळ,<br>जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी<br>महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ,<br>उद्योग भवन,कलेक्टर ऑफीसच्या जवळ<br>जिल्हा-कोल्हापूर,<br>फोन नं. २६५१२७१/९२२५६२९०२६ | २२ | श्री. जी. एन. शेळके,<br>जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी<br>महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ,<br>जिल्हा उद्योग केंद्र,जिल्हा-लातूर-४१३ ०१२,<br>फोन नं. २२०१४४/९२२५६२९०३२ |
| १५ | श्री. बी. सी. राऊत,<br>जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी<br>महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ,<br>जिल्हा उद्योग केंद्र,औद्योगिक वसाहत, जिल्हा-औरंगाबाद ४३१ ००१, | २३ | श्री. एस. पी. वानरे, जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी<br>महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ,अरुणोदय बिल्डींग,सुवर्णनगर,शिवाजी हायस्कुलच्या मागे, जिल्हा-बुलढाणा<br>फोन नं. २४२८६७/९२२५६२९०४१ |

| | | | |
|---|---|---|---|
| | फोन नं. २३३४५६९/९२२५६२९०२९ | | |
| १६ | श्री. डी. एस. मोरे, जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी,<br>महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ,<br>जिल्हा उद्योग केंद्र,एम.आय.डी.सी.एरिया<br>प्लॉट नं.७,जिल्हा-जालना ४३१ २०३,<br>फोन नं. २२०६२८/९२२५६२९०३३ | २४ | श्री. आर.जी.डांगर, जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी,<br>महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ,<br>जिल्हा उद्योग केंद्र,जुने कॉटन मार्केट,<br>जिल्हा-अकोला-४४४ ००१,<br>फोन नं. २४३०२५०/९२२५६२९०४० |
| १७ | श्री. व्ही.के.बोरीकर,<br>जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी<br>महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ,<br>जिल्हा उद्योग केंद्र,ऑक्ट्राय नाका नं.१८<br>जिल्हा-परभणी, फोन नं. २२२०४१०/९२२५६२९०३४ | २५ | श्री. पी. डी. चेचरे, जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी<br>महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ,<br>कोल्हटकरवाडी,महिला आर्थिक विकास मंडळाच्या कार्यालयाच्या बाजुला,जि-वाशिम,<br>फोन नं. २३३८८२/९२२५६२९०३९ |
| १८ | श्री. ई.एच.सोनावणे,<br>जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी<br>महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ,<br>कक्ष क्र.एस-११, दुसरा मजला,प्रशासकीय इमारत, जिल्हा -हिंगोली,<br>फोन नं. २२०४८६/९२२५६२९०३५ | २६ | श्री. बी.सी.ासऊत,<br>जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी<br>महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ,<br>जिल्हा उद्योग केंद्र,कलेक्टर ऑफीस मागे,जिल्हा-अमरावती ४४४ ६०१,<br>फोन नं. २६६२७६२/९२२५६२९०३७ |
| १९ | श्री. आर. टी.खंदारे,<br>जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी,<br>महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ,<br>जिल्हा उद्योग केंद्र,बशीरगंज, जिल्हा-बीड,<br>फोन नं. २२२५१७/९२२५६२९०३० | २७ | श्री.जी.आर.चव्हाण,जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी<br>महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ,<br>उद्योग भवन,तिसरा माळा(पूर्व), लोहार रोड यवतमाळ-४४५००१, जिल्हा-यवतमाळ,<br>फोन नं. २४४७९१/९२२५६२९०३८ |
| २० | श्री. पी.एम.जाधव,<br>जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी<br>महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, | २८ | श्री. एस.एस.बोबडे,,<br>जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी<br>महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, |

| | | | |
|---|---|---|---|
| | जिल्हा उद्योग केंद्र,शिवाजी नगर, औद्योगिक एरिया, जिल्हा-नांदेड, फोन नं. २४०६७४/९२२५६२९०३६ | | जिल्हा उद्योग केंद्र,कलेक्टर ऑफीसच्या जवळ, जिल्हा-वर्धा, फोन नं. २४३३८२/९२२५६२९०४३ |
| २९ | श्री.पी.व्ही.कुभारे,जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, जिल्हा उद्योग केंद्र,६ वा मजला, सिव्हील लाईन, जिल्हा-नागपूर, फोन नं. २५३४९४२/९२२५६२९०४२ | ३३ | श्री. आर.ए.पाचपोळ, जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, कलेक्टर कचेरी जवळ, बॅरेक जिल्हा उद्योग केंद्र, जिल्हा-गडचिरोली-५५२ ६०५ फोन नं. २२२०५९/ |
| ३० | श्री. व्ही. अे. गुरव, जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, जिल्हा उद्योग केंद्र,नॅशनल हायवे, तहसिलदार ऑफीस जवळ आणि सब पोलीस ऑफीस जवळ, जिल्हा-भंडारा, फोन नं. २५२५२१/९२२५६२९०४६ | ३४ | श्री. एस. एस. शेवाळे, संचालक, हातकागद संस्था, शेतकी महाविद्यालय आवार, के.बी.जोशी पथ, पुणे-५, फोन नं. २५५३८८३८/९२२५६२९०२२ |
| ३१ | श्री. एस. बी. व्यवहारे, जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, विठठल भवन,दुर्गाचौक,कृष्णपुरा वार्ड, तालुका,जिल्हा-गोंदिया, फोन नं. २३१७७०/९२२५६२९०४७ | ३५ | श्री. डी. आर. पाटील, प्रभारी संचालक, मधुमक्षिक पालन केंद्र, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, सरकारी बंगला नं.५, महाबळेश्वर, जि.सातारा फोन नं. २६०२६४/९२२५६२९०२४ |
| ३२ | श्री. बी. बी.जगताप, जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, जिल्हा उद्योग केंद्र, एस.टी.स्टॅन्ड मागे, जिल्हा-चंद्रपूर ४४२ ४०१. फोन नं. २२५२१४२/९२२५६२९०४४ | ३६ | श्री डी. बी. सातर्डेकर, व्यवस्थापक, सुतारी लोहारी कार्यशाळा, गोकुळ शिरगाव, जिल्हा कोल्हापूर, फोन नं. २६७२१७६/९२२५६२९०२७ |

## प्रकरण एक

## प्रारंभिक

| | | |
|---|---|---|
| | १.(१) या अधिनियमास मुंबई खादी व ग्रामोद्योग अधिनियम, १९६० असे म्हणावे | संक्षिप्त नाव,व्याप्ती व प्रारंभ |
| | ४.(२) तो, संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू आहे.)<br>(३) तो, ताबडतोब अंमलात येईल.<br>------------------------------------------------------------------------ | |
| | १. उद्देश व कारणे यांचे निवेदन यासाठी मुंबई शासन राजपत्र १९६०, भाग पाच, पृष्ठ ३२-३३ (इंग्रजी) पहा. | राजपत्र |
| | २. सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम २८, कलम २ आणि कलम ३(अ) अन्वये" एक किंवा अधिक मंडळाची " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यांत आला. | |
| | ३. वरील अधिनियमाच्या या कलम ३ (ब) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यांत आला. | |
| | ४. मूळ पोट-कलम (२) ऐवजी हे पोट-कलम, खादी व ग्रामोद्योग मंडळ (मुंबई,पुणे व पूर्व खानदेश) (पुनर्रचना) आदेश, १९६१ अन्वये दाखल करण्यात आले.<br>हा आदेश भारत सरकारची अधिसूचना,गृह मंत्रालय,क्रमांक जी.एस.आर.<br>(एफ ८/१४/६०-एसआर (आर) --२४ ),दिनांक ११ डिसेंबर १९६१ यामध्ये प्रसिध्द करण्यात आला होता.<br>ही अधिनियमाच्या प्रारंभाची तारीख होय. | |
| व्याख्या | २. संदर्भावरुन अन्यथा अपेक्षित नसेल तर, या अधिनियमात -- | |
| | १. (अ) " मंडळ" म्हणजे या अधिनियमान्वये रचना करण्यात आलेले महाराष्ट्र खादी व ग्रामोद्योग मंडळ.) | |
| | २. (अअ) " सभापती " म्हणजे मंडळाचा सभापती. | |
| १९५६ चा ६१. | (अब) " आयोग " म्हणजे खादी व ग्रामोद्योग मंडळ अधिनियम, १९५६ अन्वये स्थापना करण्यांत आलेला खादी व ग्रामोद्योग आयोग. | |
| | (अक) " परिषद" म्हणजे या अधिनियमान्वये रचना करण्यात आलेली महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग परिषद.) | |
| १९६० चा महाराष्ट्र १७. | ३. (अड) " कुटीरोद्योग " म्हणजे, महाराष्ट्र उद्योगांना राज्यसहाय्य अधिनियम,१९६० यांच्या कलम, २, खंड (ब) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे असेल, असा कुटीरोद्योग | |
| | (अई) " जिल्हा समिती" म्हणजे, कलम ७-अ अन्वये रचना करण्यांत आलेली समिती.) | |
| | (ब) " खादी " म्हणजे भारतात हाताने कातलेल्या कापसाच्या, रेशमाच्या किंवा लोकरीच्या सुतापासून अथवा अशा सुतापैकी कोणत्याही दोन किंवा सर्व सुतांच्या मिश्रणापासून भारतात हातमागावर विणलेले आणि ४ (आयोगाने) खादी म्हणून प्रमाणित केलेले कोणतेही कापड. | |

| | | |
|---|---|---|
| | ४ . ( आणि त्यात, अशा कापडापासून बनविलेल्या तयार कपडयांचा समावेश होईल.) | |
| | (५. (क) ‘‘ सदस्य ‘‘ म्हणजे मंडळाचा सदस्य आणि त्यात, मंडळाचा सभापती, उप-सभापती व सदस्य-सचिव किंवा सदस्य-सचिव यांचा समावेश होईल. | |
| | (कअ) ‘‘ सदस्य सचिव ‘‘ म्हणजे मंडळाचा सदस्य-सचिव ) | |
| | (ड) ‘‘ विहित ‘‘ म्हणजे या अधिनियमान्वये केलेल्या किवा केले आहेत असे मानण्यांत येणाऱ्या नियमान्वये विहित केलेले. | |
| | (ई) ‘‘ विनियम ‘‘ म्हणजे, या अधिनियमान्वये केलेले किवा केले आहेत असे समजण्यांत येणारे विनियम. | |
| १९६० चा महा.१७. | ६.( (ईअ) ‘‘ लघु उद्योग ‘‘ म्हणजे, महाराष्ट्र उद्योगांना राज्यसहाय्य अधिनियम, १९६० यांच्या कलम २, खंड (ई) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे असेल असा लघु उद्योग.) | |
| | ७.( (इइ) ‘‘ उप सभापती ‘‘ म्हणजे, मंडळाचा उप सभापती<br>----------------------------------------------------------------------------- | |
| | १. सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८, कलम ४ (अ) अन्वये, खंड (अ) हा बदली दाखल करण्यात आला. | |
| | २. वरील अधिनियमाच्या कलम ४ (ब) अन्वये हे खंड, समाविष्ट करण्यात आले. | |
| | ३. सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम ५५, कलम २ (अ) अन्वये खंड (अड) आणि (अई) हे, समाविष्ट करण्यात आले. | |
| | ४. वरील अधिनियमाच्या कलम ४ (क) अन्वये, ‘‘ खादी व ग्रामोद्योग मडळ अधिनियम १९५६ अन्वये स्थापन केलेल्या खादी व ग्रामोद्योग मडळानें‘‘ या मजकुराऐवजी ‘‘आयोगानें‘‘ हा शब्द दाखल करण्यात आला व ‘‘ आणि तीत ........ इ.‘‘ मजकूर जादा दाखल करण्यांत आला. | |
| | ५. सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम २८, कलम ४ (ड) अन्वये खंड (क) ऐवजी खंड (क) आणि (कअ) दाखल करण्यात आले. | |
| | ६. सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५५, कलम २ (ब) अन्वये खंड (इअ हा) समाविष्ट करण्यात आला. | |
| | ७. सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८, कलम ४ (इ) अन्वये खंड (इइ) हा समाविष्ट करण्यात आला. | |
| | १.(फ) ‘ ग्रामोद्योग‘‘ म्हणजे-- | |
| | (एक) खादी व ग्रामोद्योग आयोग अधिनियम, १९५६ च्या अनुसुचीमध्ये विनिर्दिष्ट करण्यांत आलेले सर्व किंवा कोणतेही उद्योग असा समजावा आणि त्यात उक्त अधिनियमाच्या कलम ३ अन्वये काढण्यात आलेल्या अधिसूचनेअन्वये उक्त अनुसुचित विनिर्दिष्ट करण्यात आल्याचे मानण्यात येणाऱ्या इतर कोणत्याही उद्योगाचा समावेश होतो. अथवा | १९५६ चा ६१ |
| | २.( एक-अ) कोणताही कुटीरोद्योग लघु उद्योग किंवा हस्तव्यवसाय उद्योग अथवा) (दोन) राज्या शासनाने,आयोग आणि मंडळ यांच्याबरोबर विचारविनिमय करुन शासकीय **राजपत्रातील** अधिसूचनेव्दारे, याबाबतीत विनिर्दिष्ट केलेला इतर कोणताही उद्योग. | |

## प्रकरण दोन

### मंडळाची स्थापना, त्याचे कायद्याने संस्थापन व त्याची रचना

| | | |
|---|---|---|
| | ३. (१) राज्य शासनास, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेव्दारे संपूर्ण राज्यासाठी महाराष्ट्र खादी व ग्रामोद्योग मंडळ या नांवाने संबोधण्यात येणारे एक मंडळ स्थापन करता येईल. | मंडळाची स्थापना व त्याचे |
| | (२) ( हे मंडळ) हा निगम निकाय असेल, त्याची अखंड अधिकार परंपरा असेल व त्याची एक सामान्य मुद्रा असेल आणि निगम म्हणून असलेल्या नावाने त्यास व त्यांच्यावर दावा लावता येईल आणि तो जंगम आणि स्थावर अशी दोन्ही प्रकारची मालमत्ता संपादन करण्यास, धारण करण्यास व तिची विल्हेवाट करण्यास आणि संविदा करण्यास तसेच या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी आवश्यक अशा सर्व गोष्टी करण्यास सक्षम असेल. | कायद्याने संस्थापन |
| | ४.(१) मंडळात राज्य शासन नेमील त्याप्रमाणे, पाचपेक्षा कमी नसतील आणि सात पेक्षा जास्त नसतील इतके सदस्य असतील, ज्या व्यक्ती, त्यांना खादी व ग्रामोद्योगाच्या विकासाशी संबंधीत असलेल्या बाबींचा अनुभव असल्यामुळे आणि अशा बाबीसंबंधातील त्यांची योग्यता दिसून आल्यामुळे राज्य शासनाच्या मते अर्ह असतील, अशा व्यक्तिंमधून सदस्यांची निवड करण्यात येईल, आणि ते, राज्य शासनाची मर्जी असे तोपर्यन्त अधिकारपद धारण करतील. | मंडळाची रचना. |
| | (२) राज्य शासन मंडळाच्या सदस्यांपैकी एका सदस्यांची मंडळाचा सभापती म्हणून आणि दुसऱ्याची उप-सभापती म्हणून नेमणूक करील आणि राज्य शासन, उरलेल्या सदस्यांपैकी एक किंवा दोन सदस्यांची, त्यास योग्य वाटेल त्याप्रमाणे मंडळाचा सदस्य-सचिव किंवा मंडळाचे सदस्य-सचिव म्हणूनसुध्दा नेमणूक करील, सर्व सदस्य किंवा त्यापैकी कोणतेही सदस्य हे राज्य शासन निदेश देईल त्याप्रमाणे, पूर्णकालिक किंवा अंशकालिक सदस्य असतील. | |
| | (३) राज्यात, राज्य शासन अधिसूचित करील अशा एका किंवा अनेक ठिकाणी मंडळाचे कार्यालय असेल आणि सर्व पत्रव्यवहार आणि सूचना तेथील पत्त्यांवर पाठविण्यात येतील.<br>----------------------------------------------------------------------- | |
| | १. सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम २८, कलम ४ (फ) अन्वये खंड (फ) दाखल करण्यात आला. | |
| | २. सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम ५५, कलम २ (क) अन्वये उप खंड<br>( एक-अ) हा समाविष्ट करण्यात आला. | |
| | ३. सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ अन्वये “ किंवा मंडळाची“ हे शब्द वगळण्यांत आले. | |
| | ४. वरील अधिनियमाच्या कलम ६ (अ) अन्वये पोट-कलम (१) बदली दाखल करण्यात आला. | |
| | ५. वरील अधिनियमाच्या कलम ६ (ब) अन्वये “ प्रत्येक मंडळ“ या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला. | |
| | ६. वरील अधिनियमाच्या कलम ७ अन्वये मूळ कलम ४ ऐवजी कलमे ४, ४ अ आणि ४ ब ही दाखल करण्यात आली | |
| सदस्यांचा पदावधी व | **४-अ** (१) कलम ४ च्या व या कलमाच्या पोट-कलम (३) च्या तरतूदीच्या अधीनतेने सदस्यांचा पदावधी आणि त्यांच्या सेवेच्या अटी व शर्ती आणि | |

| | | |
|---|---|---|
| त्यांच्या सेवेच्या अटी व शर्ती | त्यांना द्यावयाचे पारिश्रमिक किंवा भत्ते या दोन्ही गोष्टी या विहित करण्यात येईल त्याप्रमाणे असतील. | |
| | (२) पोट-कलम (३) च्या तरतूदीच्या अधीनतेने -- | |
| | (अ) सभापतीस, त्यांच्या संपूर्ण पदावधीमध्ये आणि पदावधी संपल्याच्या लगतनंतर पंधरा दिवसांच्या कालावधीपर्यन्त मुंबईतील निवासस्थानाचा विनाभाडे वापर करण्याचा हक्क असेल किंवा अशा निवासस्थानाच्या ऐवजी विहित केलेल्या दराने घरभ-ता मिळण्याचा हक्क असेल. | |
| | (ब) या पोट-कलमामध्ये तरतूद केलेले कोणतेही निवासस्थान सुस्थितीत ठेवण्याच्या संबंधात सभापतीवर व्यक्तिशः कोणताही आकार पडणार नाही. | |
| | (क) मंडळास सभापतीच्या वापरासाठी म्हणून वेळोवेळी, मोटारगाडी किंवा इतर योग्य वाहन खरेदी करता येईल व पुरविता येईल. मात्र अशी गाडी किंवा वाहन हे, सुस्थितीत व दुरुस्त स्थितीत ठेवण्यासंबंधात राज्य शासनाकडून याबाबतीत करण्यात येतील अशा नियमान्वये निर्धारित करण्यात येतील अशा शर्तीवर देण्यात येईल. | |
| | (३) या कलमामध्ये किंवा त्या अन्वये करण्यात आलेल्या कोणत्याही नियमामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य विधानमंडळाच्या सदस्यास, तो मंडळाचा सभापती किंवा सदस्य म्हणून अधिकारपद धारण करीत असताना, पोट-कलम (२) मध्ये तरतूद करण्यात आलेल्या कोणत्याही, सवलती किंवा कोणतेही पारिश्रमिक अथवा असे अधिकारपद धारण करणाऱ्यास मंडळाच्या, परिषदेच्या किंवा मंडळाच्या कोणत्याही समितीच्या सभेस उपस्थित राहताना किंवा असे अधिकारपद धारण करणारा म्हणून इतर कोणतीही कार्ये पार पाडताना होणारा वैयक्तिक खर्च भागविण्याच्या प्रयोजनासाठी म्हणून, दे ण्यात येणारा प्रवास भत्ता, दैनिक भत्ता किंवा इतर भत्ता याव्यतिरिक्त भत्ते मिळण्याचा हक्क असणार नाही. | |
| | (४) मंडळाचा मुख्य कार्यकारी अधिकारी, वित्त सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी आणि इतर सर्व अधिकारी व कर्मचारी हे अध्यक्षाच्या अधीक्षणाखाली व नियंत्रणाखाली काम करतील. | |
| सदस्याने अधिकार पदाचा राजीनामा देणे. | **४-ब.** मंडळाच्या कोणत्याही सदस्यस, राज्य शासनास उद्देशून आपल्या सहीनिशी लेखी अर्ज करुन, कोणत्याही वेळी, आपल्या अधिकार पदाचा राजीनामा देता येईल. | |
| रिकामी जागा शक्य तितक्या लवकर भरणे. | ५. १.(एखादा सदस्य मरण पावल्यास किंवा त्याने राजीनामा दिल्यास ) यथास्थिती, त्याच्या मृत्यूच्या तारखेपासून किंवा ज्या तारखेस राजीनामा स्वीकारण्यात आला असेल त्या तारखेपासून तो मंडळाचा सदस्य असण्याचे बंद होईल आणि या प्रमाणे<br>२.( किंवा अन्यथा ) रिकामी झालेली कोणतीही जागा, राज्य शासन शक्य होईल तितक्या लवकर भरील. | |
| | परंतु, अशा कोणत्याही रिकाम्या जागेच्या कालावधीत जणू काही कोणतीच जागा रिकामी झालेली नसावी त्याप्रमाणे चालू राहिलेल्या सदस्यांना कृती करता येईल. | |
| कार्यवाही उचित व विधिग्राहय आहे असे गृहीत धरणे | ६. राजीनाम्यामुळे, मृत्यूमुळे किंवा अन्यथा ३.( मंडळाच्या) सदस्यांची कोणतीही जागा रिकामी होती किंवा ३( मंडळाच्या) रचनेत कोणताही दोष होता ४.( किंवा मंडळाने कोणत्याही बाबतीत परिषदेचा सल्ला घेतला नव्हता ) याच केवळ कारणावरुन ( मंडळाच्या) कोणत्याही कृतीबद्दल किंवा कार्यवाहीबद्दल आक्षेप घेता येणार नाही किंवा अशी कोणतीही कृती किंवा कार्यवाही विधिअग्राहय ठरविता येणार नाही. | |

| | | |
|---|---|---|
| | १. सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८, कलम ८ (अ) अन्वये " मंडळाचा एखादा सदस्य मरण पावला असेल किंवा कलम ४ यात तरतूद करण्यात आल्याप्रमाणे त्याने राजीनामा दिला असेल" या मजकुराऐवजी हा मजकूर, दाखल करण्यात आला. | |
| | २. वरील अधिनियमाच्या कलम ८ (ब) अन्वये हे शब्द जादा दाखल करण्यात आले. | |
| | ३. वरील अधिनियमाच्या कलम ९ (१) अन्वये मंडळ या शब्दाऐवजी हे शब्द जादा दाखल करण्यांत आले. | |
| | ४. वरील अधिनियमाच्या कलम ९ (२) अन्वये हे शब्द जादा दाखल करण्यात आले. | |
| | **६-अ** (१) मंडळास, या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदीचे अनुपालन करण्यासाठी म्हणून त्यास ज्यांचे सहाय्य किंवा ज्यांचा सल्ला आवश्यक आहे असे वाटेल अशा कोणत्याही व्यक्तिंना, अधिनियमान्वये करण्यात आलेल्या विनियमांवद्वारे निर्धारीत करण्यात येईल अशा रितीने व अशा शर्तीवर आणि अशा प्रयोजनांसाठी म्हणून, स्वतःशी संबद्व करुन घेता येईल. | विशिष्ट प्रयोजनासाठी म्हणून व्यक्तींना मंडळाशी |
| | (२) मंडळाने, कोणत्याही प्रयोजनांसाठी म्हणून पोट-कलम (१) अन्वये स्वतःशी संबद्व करुन घेतलेल्या व्यक्तीस, उक्त प्रयोजनाशी संबंधीत असेल अशा, मंडळाच्या चर्चेमध्ये भाग घेण्याचा हक्क असेल, परंतु तिला मतदानाचा हक्क असणार नाही आणि इतर कोणत्याही प्रयोजनाशी संबंधीत असलेल्या बाबींवरील मंडळाच्या चर्चेमध्ये भाग घेता येणार नाही. | तात्पुरती संबद्व करुन घेणे. |
| | (३)राज्य शासनास, आदेशाव्दारे, मंडळाच्या कोणत्याही सभांमध्ये उपस्थित राहण्यासाठी आणि मंडळाच्या चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी म्हणून आपले एक किंवा अधिक अधिकारी प्रतिनियुक्त करता येतील, परंतु अशा अधिकाऱ्यास किंवा अधिकाऱ्यांना मतदानाचा हक्कम असणार नाही. | |
| | **६-ब** (१) मंडळास या अधिनियमाखालील त्याची कामे पार पाडण्यात सहाय्य देण्याच्या प्रयोजनासाठी-परिषदेची रचना म्हणून राज्य शासनास, मंडळाशी विचारविनिमय करुन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेव्दारे, महाराष्ट्र राज्य खांदी व ग्रामोद्योग परिषद या नावाने संबोधण्यात येणाऱ्या एका परिषदेची रचना करता येईल. | |
| | **२ (परिषदेमध्ये,----** | |
| | (अ) मंडळाचा सभापती आणि इतर सदस्य. | |
| | (ब) सर्व जिल्हा समित्यांचे सभापती,आणि | |
| | (क) अतिरिक्त सदस्यांपैकी राज्य शासनाला योग्य वाटतील तितके ( चारपेक्षा अधिक नसलेले ) सदस्य यांचा समावेश असेल.) | |
| | या व्यक्ति, खादी व ग्रामोद्योगाच्या विकासाशी संबंधीत असलेल्या बाबींचा अनुभव व उक्त बाबीसंबंधी दृढ अभिरुची असल्याकारणाने ज्या व्यक्ति राज्य शासनाच्या मते अर्ह असतील अशा व्यक्तींमधून निवडण्यांत येतील. | |
| | ३ (१-अ) मंडळाचा सभापती हा परिषदेचा पदसिध्द सभापती असेल.) | |
| | (२) मंडळ, सामान्यतः या अधिनियमाखालील आपली कार्ये पार पाडताना परिषदेशी विचारविनिमय करील. | |
| | (३) परिषदेच्या सदस्यांना ४( विहित करण्यात येईल असे भत्ते देण्यात येतील आणि) ते राज्य शासनाची मर्जी असेतोपर्यन्त **अधिकारपद** धारण करतील | |
| | सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८, कलम १० अन्वये कलमे ६ अ आणि ६ ब ही, समाविष्ट करण्यात आला. | |

| | | |
|---|---|---|
| | १ सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम ५५, कलम ३ (अ) अन्वये ' परिषदेत'' या शब्दाने सुरु होणाऱ्या आणि ''असतील'' या शब्दाने संपणाऱ्या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आली | |
| | पोट-कलम (१ अ) हे वरील अधिनियमाच्या कलम ३ (ब) अन्वये समाविष्ट करण्यात आले.<br>सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७कलम २(ब) अन्वये हा मजकुर समाविष्ट करण्यांत आला. | |
| मंडळाचा मुख्य कार्यकारी | **(७.** (१) मंडळ, आपल्या कारभाराच्या व्यवस्थापनासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी नेमील. | |
| अधिकारी वित्त सल्लागार आणि इतर अधिकारी | (२) मुख्य कार्यकारी अधिकारी हा, राज्य शासनाने ज्या शासकीय कर्मचाऱ्याच्या सेवा मंडळाच्या स्वाधीन केल्या असतील असा शासकीय कर्मचारी असू शकेल, आणि जर तो शासकीय कर्मचारी असेल तर त्याचे पारिश्रमिक, भत्ते व सेवेच्या इतर शर्ती या, राज्य शासन निश्चित करीत त्याप्रमाणे असतील. | |
| व कर्मचारी आणि त्यांच्या | (३) राज्य शासनाची पूर्वमान्यता घेऊन मंडळ निश्चित करील त्यानुसार मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांची कार्ये, कर्तव्ये व अधिकार असतील. | |
| सेवेच्या शर्ती | (४) मंडळाने राज्य शासनाची पूर्वमान्यता घेऊन, वित्त सल्लागार म्हणून एका व्यक्तीची ( सदस्य नसेल अशा) नेमणूक करील. वित्त सल्लागार हा मंडळाचा मुख्य लेखा अधिकारी म्हणून सुध्दा काम करील. | |
| | (५) वित्त सल्लागाराचा पदावधी, त्याच्या सेवेच्या शर्ती व त्याची कार्ये ही विहित करण्यात येतील त्याप्रमाणे असतील. | |
| | (६) पदे निर्माण करण्यासंबंधात या बाबतीत करण्यात येतील अशा नियमांच्या अधीनतेने मंडळास, आपली कार्ये सक्षमतेने पार पाडण्यासाठी म्हणून आवश्यक वाटतील अशी पदे निर्माण करता येईल व असे इतर अधिकारी व कर्मचारी नेमता येतील. | |
| | परंतु, मंडळास, या बाबतीतील आपले अधिकार मंडळाच्या सभापतीकडे व इतर सदस्यांकडे किंवा अधिकाऱ्यांकडे प्रत्यायोजित करता येतील. | |
| | (७) पोट-कलम (२) व पोट-कलम (५) च्या तरतुदीच्या अधीनतेने मंडळाच्या अधिकाऱ्यांचे व कर्मचाऱ्यांचे पारिश्रमिक, भत्ते व सेवेच्या इतर शर्ती या, विनियमांव्दारे निर्धारीत करण्यात येतील त्याप्रमाणे असतील.) | |
| जिल्हा समित्यांची रचना आणि त्यांचे अधिकार व कार्ये | **२(७-अ (१)** या बाबतीत करण्यांत आलेल्या कोणत्याही नियमांच्या अधीनतेने मंडळ, त्याच्या कार्यक्रमाचा ग्रामीण क्षेत्रामध्ये अधिक परिणामकारक प्रभाव पाडण्यासाठी राज्यातील प्रत्येक जिल्हयामध्ये जिल्हा समिती म्हणून संबोधावयाच्या एका समितीची स्थापना करील. तिच्यामध्ये पुढील सदस्यांचा समावेश असेल.--- | |
| | (अ) मंडळाने राज्य शासनाच्या मान्यतेने सभापती म्हणून नेमावयाची एक अशासकीय व्यक्ती | सभापती. |
| | (ब) जो सर्वसामान्यपणे जिल्हा समितीच्या समाजकल्याण समितीचा सभापती असेल असा जिल्हा परिषदेचा एक प्रतिनिधी. | सदस्य. |
| | (क) जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंकेचा सभापती | सदस्य. |
| | (ड) जिल्हा लीड बॅंकेचा एक प्रतिनिधी | सदस्य. |
| | (ई) तीन अशासकीय व्यक्ति | सदस्य. |
| | यांच्यापैकी निदान एकतरी व्यक्ति ही अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती, विमुक्त जाती किंवा भटक्या जमाती यापैकी असेल आणि त्यांच्यापैकी एकतरी | |

| | | |
|---|---|---|
| | व्यक्ती स्त्री असेल. | |
| | (फ) जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था | सदस्य. |
| | (ग) जिल्हा उद्योग अधिकारी | सदस्य |
| | (घ) जिल्हा समाज कल्याण अधिकारी | सदस्य |
| | (आय) मंडळाचा जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी. | सदस्य-सचिव |
| १९७७ चा महा.५५ | (२) पोट-कलम (१) अन्वये कोणत्याही जिल्हयामध्ये जिल्हा समित्यांची प्रथम रचना करण्यात आल्यानंतर, मंडळाकडून रचना करण्यांत आलेल्या व मुंबई खादी व ग्रामोद्योग (सुधारणा) अधिनियम, १९७७ यांच्या प्रारंभाच्या तारखेला कार्य करीत असलेल्या सर्व विभागीय समित्या, जिल्हा समित्या व तदर्थ समित्या ( तशा असल्यास) त्या जिल्हयामध्ये कार्य करण्याचे बंद होईल.<br>-------------------------------------------------- | |
| | (१) सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८, कलम ११ अन्वये, मूळ कलमाऐवजी कलम ७ दाखल करण्यांत आले. | |
| | (२) सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५५, कलम ४ अन्वये कलम ७ अ समाविष्ट करण्यांत आले. | |
| | (३) जिल्हा समित्यांच्या सदस्यांचा पदावधी सर्वसाधारणपणे मंडळाच्या सदस्यांच्या पदावधी इतका असेल. परंतु मंडळास, कोणत्याही वेळी जिल्हा समित्यांपैकी कोणत्याही जिल्हा समितीची पुनर्रचना करणे आवश्यक वाटल्यास, तसे करता येईल. | |
| | (४) मंडळास, राज्य शासनाच्या पूर्व मंजूरीने वेळोवेळी, याबाबतीत करण्यात आलेल्या विनियमांव्दारे विनिर्दिष्ट करण्यात येतील असे त्याचे अधिकार ( विनियम करण्याच्या अधिकारांखेरीज ) व अशी त्याची कार्ये जिल्हा समितीकडे प्रत्यायोजित करता येतील. | |
| | (५) जिल्हा समितीकडे प्रत्यायोजित करण्यात आलेल्या सर्व किंवा कोणत्याही अधिकारांचा ती समिती योग्य रितीने वापर करीत नाही असे मंडळाचे मत असेल तर त्यास असे सर्व किंवा कोणतेही अधिकार आणि कार्ये काढून घेता येतील. | |
| | (६) जिल्हा समितीच्या कोणत्याही सदस्यास, कोणत्याही वेळी, आपल्या सहीने जिल्हा समितीच्या सभापतीस उद्देशून पत्र लिहून आपल्या अधिकारपदाचा राजीनामा देता येईल. | |
| | (७) जिल्हा समितीच्या एखाद्या सदस्याचे अधिकारपद राजीनामा, मृत्यू यामुळे किंवा अन्यथा, रिकामे झाल्यास मंडळ ते रिकामे अधिकारपद व्यवहार्य असेल तितक्या लवकर भरील. | |
| | परंतु, असे कोणतेही अधिकारपद रिकामे असल्याच्या कालावधीत जणू कोणतेच असे अधिकारपद रिकामे झालेले नसावे त्याप्रमाणे चालू राहिलेल्या सदस्यांना कृती करता येईल. | |
| | (८) सदस्यांपैकी कोणाचेही अधिकारपद राजीनामा, मृत्यू यामुळे किंवा अन्यथा, रिकामे झाल्याच्या कारणावरुन किंवा जिल्हा समितीच्या रचनेमध्ये कोणताही दोष असल्याच्या कारणावरुनच केवळ जिल्हा समितीच्या कोणत्याही कृतीबाबत किंवा कार्यवाहीबाबत हरकत घेता येणार नाही किंवा ती विधिअग्राहय ठरविता येणार नाही. | |
| | (९) मंडळाच्या विविध परियोजनांचे योग्य व परिणामकारक रितीने कार्यान्वयन करण्यास जिल्हा समिती जबाबदार असेल व ती मंडळास स्पष्टीकरण | |

| | | |
|---|---|---|
| | देण्यास पात्र राहील. | |
| | (१०) जिल्हा समिती आपल्या अधिकारांचा वापर करताना व कार्ये पार पाडताना मंडळाच्या सर्वसाधारण पर्यवेक्षणाखाली काम करील. आणि मंडळाकडून वेळोवेळी देण्यात आलेल्या सूचना व निदेश यांचे पालन करील. कोणत्याही बाबीच्या संबंधात जिल्हा समिती व मंडळ यांच्यामध्ये कोणताही वाद निर्माण झाल्यास मंडळाचा निर्णय अंतीम असेल. | |
| | (११) मंडळाचा जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी हा जिल्हा समितीचा प्रमुख कार्यकारी अधिकारी असेल आणि तो जिल्हा समितीकडून किंवा मंडळाकडून त्याच्याकडे सोपविण्यांत येतील अशा अधिकारांचा वापर करील व अशी कामे पार पाडील. | |
| | (१२) जिल्हा समितीच्या सभापतीला व इतर सदस्यांना, विहित करण्यात येतील असे भत्ते देण्यांत येतील.) | |
| | **१(८.** (१) याबाबतीत करण्यांत येतील अशा कोणत्याही नियमांच्या अधीनतेने मंडळास, आपली कामे सक्षमतेने पार पाडता यावीत आणि विशेषतः कोणत्याही विशिष्ट खांदी व ग्रामोद्योगाची स्थिती व त्याच्या गरजा विचारात घेऊन अशी कामे पार पडावीत म्हणून वेळोवेळी, एक किंवा अधिक समित्यांची रचना करता येईल. अशा समित्यांची कोणत्याही विनिर्दिष्ट स्थानिक क्षेत्रासाठी रचना करता येईल.<br>२.* * * * * *<br>------------------------------------------------------------------------ | समित्यांची नेमणूक |
| | १. सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८, कलम १२ अन्वये कलम ८ हे बदली दाखल करण्यात आले. | |
| | २. सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५५, कलम ५ (अ) अन्वये '' परंतु'' या शब्दाने सुरु होणारा व '' येईल'' शब्दाने संपणारा मजकूर वगळण्यात आला. | |
| मंडळाच्या व परिषदेच्या सभा. | अश्या प्रत्येक समितीत एक अध्यक्ष व एड्ढ सदस्य सचिव असेल<br>* * * * * *<br>**(९.** या अधिनियमान्वये मंडळ विनियमांव्दारे तरतूद करील अशा वेळी व अशा ठिकाणी अशा प्रत्येक समितीत, एक अध्यक्ष व एक सदस्य-सचिव असेल. व परिषद सभा घेईल व त्यांच्या सभांमधील कामकाज चालविण्या- संबंधातील कार्यपध्दतीबाबतच्या (सभांतील गणपूर्तीसाठीची संख्या ठरविणे धरुन) अशा नियमांचे पालन करील. | |
| | परंतु मंडळाची सामान्यतः महिन्यातून निदान एकदा व परिषदेची सामान्यतः दर तीन महिन्यांतून एकदा सभा भरविली पाहिजे.) | |
| संविदा करण्याचा अधिकार | **(१०.** (१) मंडळास या अधिनियमाच्या प्रयोजनांपैकी कोणतेही प्रयोजन पार पाडण्यासाठी आवश्यक किंवा इष्ट वाटतील अशा सर्व संविदा करता येतील व त्या पार पाडता येतील. | |
| | (२) प्रत्येक संविदा अध्यक्ष ३ या मंडळाच्या वतीने करील. | |

| | | |
|---|---|---|
| | | |
| | परंतु, सभापतीस, लेखी आदेशाव्दारे, त्याने त्याबाबत विनिर्दिष्ट केलेल्या बाबतीत, याबाबतचे आपले अधिकार उप सभापतीकडे किंवा ३( मंडळाच्या)४(सदस्य सचिवाकडे अथवा सदस्य सचिवांकडे ) किंवा ३(जिल्हा समितीच्या सदस्य सचिवाकडे) सोपविता येतील. | |
| | (३) मंडळाच्या वतीने केलेली प्रत्येक संविदा ही, या कलमाच्या तरतुदीच्या अधीनतेने विहित करण्यात येईल अशा पध्दतीने व अशा नमुन्यात केली पाहिजे. | |
| | (४) हे कलम आणि त्याअन्वये केलेले नियम यांत तरतूद केलेल्या रितीने न केलेली संविदा मंडळावर बंधनकारक असणार नाही. | |
| | **प्रकरण तीन** | |
| | **मंडळाची कार्ये व अधिकार** | |
| मंडळाची कार्ये | **(११.** (१) खादी व ग्रामोद्योग यांना प्रोत्साहन देणे, त्यांचे संघटन, विकास व विनियमन करणे आणि राज्य शासन, वेळोवेळी, विहित करुन देईल अशी इतर कार्ये पार पाडणे हे<br>५( मंडळाचे ) कर्तव्य असेल. | |
| | (२) पोट-कलम (१) मधील तरतुदीच्या सर्वसाधारणतेस बाध न आणता, ६(मंडळाने) विशेष करुन पुढील कर्तव्ये आणि कामे यांपैकी सर्व किंवा कोणतीही कर्तव्ये केली पाहिजेत व कामे पार पाडली पाहिजेत.-- | |
| | (अ) खादी व ग्रामोद्योग सुरु करणे, त्यांना प्रोत्साहन देणे, मदत करणे व ते चालू ठेवणे आणि अशा उद्योगांशी संबंधीत असलेला व्यापार किंवा धंदा चालविणे व अशा व्यापाराशी किंवा धंद्याशी आनुषगिक असलेल्या बाबतीत व्यापार किंवा धंदा चालविणे.<br>------------------------------------------------------------------------------------ | |
| | १. हे, सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५५, कलम ५ (ब) अन्वये पोट-कलम (२) वगळण्यांत आले. | |
| | २. सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८, कलम १३ अन्वये मूळ कलम ९ ऐवजी हे कलम ९ दाखल करण्यांत आले. | |
| | ३. सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५५, कलम ६ व्दारे ‘‘ किंवा विभागीय समितीच्या सभापतीकडे या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला. | |
| | ४. वरील अधिनियमाच्या कलम १४ (ब) व्दारे ‘‘ चिटणिसाकडे‘‘ या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला. | |

| | | |
|---|---|---|
| | ५. सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८, कलम १५ अन्वये “ प्रत्येक मंडळाचे“ या मजकुराऐवजी “ मंडळ“ हा मजकूर त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह, दाखल करण्यात आला. | |
| | (ब) लोकांना त्यांच्या घरी काम पुरवून मदत करणे आणि विहित करण्यांत येतील त्या अटींवर, व्यक्तिंना किंवा संस्थांना किंवा परिसंस्थांना कर्जे व अन्य स्वरुपाचें आर्थिक सहाय्य देणे. | |
| | (क) खादी व ग्रामोद्योगांसाठी सहकारी संस्था स्थापन करण्यास प्रोत्साहन देणे. | |
| | (ड) प्रशिक्षण केंद्र चालविणे व अशा केंद्रात खादी व ग्रामोद्योग सुरु करण्यासाठी किंवा चालविण्यासाठी लोकांना आवश्यक असणारे ज्ञान प्राप्त करुन देण्याच्या दृष्टीने त्यांना प्रशिक्षण देणे. | |
| | (ई) (एक) खादी व ग्रामोद्योग चालविण्यासाठी आवश्यक असणारी हत्यारे आणि अवजारे तयार करणे, आणि अशा उद्योगांच्या वस्तू तयार करणे. | |
| | (दोन) उक्त प्रयोजनासाठी आवश्यक असेल अशा कच्चा माल आणि अशी हत्यारे व अवजारे पुरविण्याची व्यवस्था करणे, आणि | |
| | (तीन) उक्त उद्योगात तयार झालेल्या मालाची विक्री करणे आणि त्याच्या विक्रीची व्यवस्था करणे. | |
| | (फ) भांडारे, दुकाने, विक्रयालये उघडून किंवा प्रदर्शने भरवून खादी व ग्रामोद्योगांपासून तयार झालेल्या वस्तूंच्या प्रसिध्दीची व त्या वस्तू लोकप्रिय करण्याची व्यवस्था करणे व त्या प्रयोजनाकरिता तत्सम उपाय योजणे. | |
| | (ग) खादी व ग्रामोद्योगांपासून तयार झालेल्या वस्तूंचा उपयोग करण्याबाबत लोकमत तयार करणे आणि अशा वस्तूंना आश्रय दिल्याने होणारे फायदे जनतेस पटवून देणे. | |
| | (ह) खादी व ग्रामोद्योग या विषयातील तज्ञांचा सल्ला आणि मार्गदर्शन घेणे व मिळविणे. | |
| | (आय) खांदी व ग्रामोद्योगासंबंधातील संशोधन कार्य हाती घेणे आणि त्यास उत्तेजन देणे तसेच या अधिनियमाच्या उद्देशांत आनुषंगिक व सहाय्यक असतील अशी कामे चालविणे. | |
| | (जे) या अधिनियमाचे उद्देश पार पाडण्याच्या प्रयोजनासाठी राज्य शासन निदेश देईल अशी इतर कर्तव्ये पार पाडणे व अशी इतर कामे करणे. | |
| | **(१२.**या अधिनियमाखालील ( आपली कर्तव्ये व कार्ये ) पार पाडण्याच्या प्रयोजनांकरिता मंडळास पुढील अधिकार असतील -- | मंडळाचे सर्वसाधारण अधिकार |
| | (एक) त्यास आवश्यक वाटेल अशी जंगम व स्थावर मालमत्ता संपादन करणे आणि ती धारण करणे आणि अशी कोणतीही मालमत्ता पट्टयाने देणे, विकणे किंवा तिचे अन्यथा हस्तांतरण करणे. | |
| | परंतु ( ज्या स्थावर मालमत्तेच्या संबंधात राज्य शासनाच्या पैशाचा संबंध येत असेल किंवा ज्या मालमत्तेचे मूल्य रुपये २५,०००/- पेक्षा अधिक असेल अशा) स्थावर मालमत्तेच्या बाबतीत उपरोक्त अधिकार हे राज्य शासनाच्या पूर्वसंमतीने वापरले पाहिजेत. | |
| | (दोन) या अधिनियमाच्या तरतुदी आणि तदन्वये केलेल्या नियमांच्या अधीनतेने या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणण्यासाठी किंवा राज्य शासन मंडळाकडे सोपवील अशा परियोजना तयार करण्यासाठी व ज्यांची अंमलबजावणी करण्यासाठी खर्च करणे आणि आपल्या अधिकारितेखालील कोणत्याही | |

| | | |
|---|---|---|
| | क्षेत्रात कामे हाती घेणे.<br>१. सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ कलम १६ (अ) अन्वये ''आपली कामे '' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.<br>२. वरील अधिनियमाच्या कलम १६ (ब) अन्वये हा मजकूर समाविष्ठ करण्यात आला. | |

## कलम ४(१)(b)(iv)

<u>निर्णय प्रक्रियेतील पर्यवेक्षण व जबाबदारीचे उत्तरदायित्व</u>

| अक्र | काम/कार्य | कामाची कालमर्यादा | जबाबदार अधिकारी/ जबाबदारीची साखळी | तक्रार निवारण अधिकारी |
|---|---|---|---|---|
| १ | विभागाच्या परिशिष्ट १ मध्ये नमूद केलेल्या विषय सूची प्रमाणे | प्रकरणाच्या गांभीर्यानुसार त्यावर असलेल्या अभिप्रायाप्रमाणे<br>तात्काळ :-<br>त्याचदिवशी<br>तातडीचे :-<br>एक दिवस अथवा दुस-या दिवशी अंतिम निर्णयाप्रत कार्यवाही<br>कालमर्यादाः-<br>न्यायालयीन प्रकरणे किंवा तत्सम प्रकरणावर विहीत कालावधीत कार्यवाही उपरोक्त कालमर्यादेचे काटेकोरपणे पालन केले जाते. | अध्यक्ष<br>^<br>मुख्य कार्यकारी अधिकारी<br>^<br>उप मुख्य कार्यकारी अधिकारी<br>^<br>सहा.मुख्य कार्यकारी अधिकारी<br>^<br>कार्यासन अधिकारी | उप मुख्य कार्यकारी अधिकारी तथा माहीती अधिकारी-राज्यस्तर<br>^<br>सहा.मुख्य कार्यकारी अधिकारी तथा माहीती अधिकारी-राज्यस्तर<br>^<br>जिल्हा ग्रामोदयोग अधिकारी तथा माहीती अधिकारी-जिल्हास्तर |

## कलम ४(१)(b)(v)

कर्मचा-यांमार्फत कर्तव्य पार पाडताना त्यांच्याकडे असणारे म्यॅनुअल/सूचना/कामाशी संबंधीत नियम/अधिनियम

१) सन १०६० चा मुंबई अधिनियम क्रमांक १९, मुंबई खादी व ग्रामोद्योग अधिनियम, १९६०
(दिनांक १ फेब्रुवारी १९८९ पर्यंत सुधारलेला)

२) महाराष्ट्र नागरी सेवा नियम (रजा, सेवेच्या सर्वसाधारण शर्ती, पदग्रहण अवधी, स्वियेतर सेवा, निलंबन इ. कालावधीतील प्रदाने निवृत्ती वेतनाचे अंशराशीकरण)

३) महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम

४) महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम

५) स्थाई आज्ञा क्र ४२५

## कलम ४(१)(b)(vi)

विभागाशी संबंधीत कार्यालयीन आदेश/धोरणात्मक परिपत्रके दस्तऐवजांची वर्गवारी

मंडळ राबवित असलेल्या विविध योजनांचे कामकाजामध्ये सुसूत्रता येण्यासाठी वेळोवेळी मंडळ सभेत धोरणात्मक निर्णय घेण्यात येतात व त्याप्रमाणे संबंधीत कार्यासनांकडून परिपत्रके काढण्यात येतात. कक्षनिहाय उपलब्ध नस्तींची यादी व वर्गीकरण वेळोवेळी करण्यात येते व खालीलप्रमाणे नस्त्यांचे वर्गीकरण व जतन केले जाते.

| अक्र | नस्तीचा वर्ग | सुरक्षित ठेवण्याचा कालावधी |
|---|---|---|
| १ | ड | १ वर्ष |
| २ | क | ५ वर्षे |
| ३ | ब | २५ ते ३० वर्षे |

| | | |
|---|---|---|
| ४ | अ | कायमस्वरुपी |

**कलम ४(१)(ड)(vii)**

विभागाच्या परिणामकारक कामासाठी जनसामान्यांशी सल्लामसलत करण्याची व्यवस्था

धोरणात्मक निर्णय हे प्रशासकीय व वित्तीय स्वरुपाचे असल्याने आम जनतेशी संबंध येत नाही. मात्र जनहिताच्या व विकासाच्या कामाच्यादृष्टीने कार्यप्रणालीत काही बदल आवश्यक असल्यास जिल्हा समित्या व बलुतेदार गट संस्था यांची मते मागविण्यात येतात, व त्याप्रमाणे कार्यवाही केली जाते.

**कलम ४(१)(b)(viii)**

**विभागातील दोन किंवा अधिक व्यक्तींनी बनलेली सल्लादाई मंडळे/परिषदा/समित्या/इतर यांची यादी**

सदर माहीती परिशिष्ट १ मध्ये नमूद केली आहे.

**कलम ४(१)(b)(ix) व (x)**

**विभागातील अधिकारी व कर्मचा-यांच्या नावांची मासिक वेतनाची व दूरध्वनींची दर्शिका**

सदर माहीती परिशिष्ट-२ मध्ये नमूद केलेली आहे.

कलम ४ (१)(b)(xi)(xii)
विभागाच्या सर्व योजनांसाठीचा प्रस्तावित खर्च आणि देण्यात आलेली रक्कम यांचा अहवाल
सदर माहीती परिशिष्ट-३ मध्ये नमूद केलेली आहे.

कलम ४ (१)(b)(xiv)(xv)

इलेक्टॉनिक्सच्या माध्यमामध्ये रुपांतरीत केलेल्या माहितीचे विवरण व नागरिकांना अशी माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत असलेल्या सुविधा

मंडळाची बेबसाईट www.mskvib.org अशी आहे.

कलम ४ (१)(b)(xvi)
विभागाच्या शासकीय माहीती अधिका-यांची नावे व पदनाम
सदर माहीती परिशिष्ट-४ मध्ये नमूद केली आहे.

कलम ४ (१)(b)(xvii)
अशा सदरात मोडणारी व इतर माहीती

निरंक

**मंडळाची कार्यकारिणी**

महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोदयोग मंडळाची स्थापना मुंबई खादी व ग्रामोदयोग अधिनियम १९६० च्या (सन १९६० चा मुंबई अधिनियम क्रमांक १९) अन्वये सन १९६५ मध्ये करण्यांत आली. अधिनियमातील तरतुदीनुसार मंडळावर किमान ५ व कमाल ७ सदस्यांची नेमणूक शासनाकडून करण्यांत येते. या शासननियुक्त सदस्यांपैकी एका सदस्याची अध्यक्ष तर दुस-या सदस्याची उपाध्यक्ष म्हणून शासनाकडून नेमणूक करण्यांत येते.

शासन अधिसूचना क्रमांक केव्हीबी -२००६(७४३८) /उदयोग-६ दिनांक २ सप्टेंबर २००६ अन्वये मंडळावर अध्यक्ष व उपाध्यक्ष यांची शासनाकडून नियुक्ती करण्यांत आलेली आहे ती खालील प्रमाणे ---

| **अ. क्र** | **नांव** | | **पदनाम** | **दुरध्वनी व मो. नंबर** |
|---|---|---|---|---|
| १) | प्रा. लक्ष्मणराव ढोबळे | ........ | अध्यक्ष | २२६९४४१७/ ०९४२२४५८६८१ |
| २) | श्री. दिगंबर गणपतराव जाधव | ........ | उपाध्यक्ष | २२७०२८१९/ ०९८९०९५६००६ |

तसेच शासनाने खालील अधिका-यांच्या सदस्य,निमंत्रित व सदस्य सचिव म्हणून केव्हीबी-२००६/९०(७४८१)उद्योग-६ दिनांक १६ एप्रिल २००७ या अधिसूचनेप्रमाणे पुढील आदेश होईपर्यंत नियुक्त्या केलेल्या आहेत.

| अ.क्र | अधिका-याचे पदनाम | पदनाम | |
|---|---|---|---|
| १ | विकास आयुक्त उद्योग | सदस्य | २२०२३५८४ |
| २ | संचालक, समाज कल्याण | सदस्य | २६१२२६५२ |
| ३ | राज्य निर्देशक खादी व ग्रामो आयोग | सदस्य | २२८२२११३ |
| ४ | व्यवस्थापकीय संचालक , महिला आर्थिक महामंडळ | सदस्य | २६५९१९१० |
| ५ | व्यवस्थापकीय संचालक महा लघु उद्योग विकास महामंडळ | निमंत्रित | २२६१७५६७ |
| ६ | मुख्य कार्यकारी अधिकारी महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ,मुंबई | सदस्यसचिव | २२६९४७२० |

## मंडळाच्या योजना व दुष्टिक्षेपात मंडळाचे कार्य

**ग्रामोद्योगाच्या विकासासाठी मंडळ खाली दर्शविलेल्या योजना राबवित आहे.**

**सन २००७ - २००८ या आर्थिक वर्षामध्ये विविध योजना व कार्यक्रमांतर्गत झालेली प्रगती**

१. **आर.ई.जी.पी. योजना :-** सदर योजने अंतर्गत एकुण १९२० लाभार्थीची रुपये १,८९२.९८ लाखाची कर्जे विविध बॅकानी मंजुर केली .गतवर्षाचे मंडळाने एकुण १६१७ लाभार्थींना रुपये १५८०.०० लाख मार्जिन मनी वाटप केले.

२. **कारागिर रोजगार हमी योजना** :-राज्यामध्ये ३१ मार्च २००९ अखेर एकुण बलुतेदार संस्थेच्या सभासद संख्येत -६०९९७६ पर्यत वाढ झाली. त्यापैकी अहवाल वर्षात -६२४६ कारागिरांना रुपये ८८३.८० लाखाचे नाबार्ड पुर्नवित मध्यम मुदत कर्ज व कॅश क्रेडीट वाटप केले.

३. **विशेष घटक योजना :-**या योजने अंतर्गत एकुण २२२० लाभार्थीना रुपये १८२.७५ लाखाचे अनुदान वाटप करण्यांत आले.

४. **ग्रामोद्योग वसाहत स्थापन करणे :-**ग्रामीण भागातील बेरोजगार लोकांना ग्रामीण भागातच ग्रामोद्योगाच्या स्थापनेसाठी आवश्यक त्या पायाभुत सुविधा एका ठिकाणी उपलब्ध व्हाव्यात,या दुष्टीने महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, खादी ग्रामोद्योग आयोग व राज्य शासनाच्या सहकार्याने राज्यात ग्रामोद्योगी वसाहती उभारण्याचे योजिले आहे. तया अनुषंगाने एमआयडीसी ने तालुका दारव्हा,जिल्हा यवतमाळ तालुका मौजे खानापुर जिल्हा अकोला,तालुका कडेगांव जिल्हा सांगली नाशिक येथे नाशिक सिन्नर तसेच बुलढाणा येथे ग्रामोद्योग वसाहतीकरीता जागा आरक्षित करुन दिलेल्या आहेत.

५. **खाते निहाय क्रेद्रे चालविणे :-** ग्रामीण पातळीवर सुशिक्षित बेरोजगारांना,उद्योजकांना तसेच शेतक-यांना जोडधंदा उपलब्ध करुन देण्याच्या दुष्टीकोनातुन प्रशिक्षण देणे,आर्थीक सहाय्य व तांत्रिक मार्गदर्शन उपलब्ध करुन देणे अशी पुरक माहिती मिळण्याच्या दुष्टीकोनातुन मंडळाने हातकांगद केंद्र पुणे, मधमाशापालन संस्था,महावळेश्वर तसेच सुतारी लोहारी कार्यशाळा,गोकुळशिरगांव ,जिल्हा कोल्हापुर येथे खाते निहाय केंद्र स्थापन केली आहेत.

६. **ग्रामोद्योगाची व्याख्या :-** मध्यवर्ती शासनाने खादी ग्रामोद्योग आयोगाच्या अधिनियमात सुधारणा करुन ग्रामोद्योगाच्या नविन व्याख्येस मान्यता दिली आहे.

ग्रामोद्योग म्हणजे ज्या ग्रामीण भागाची लोकसंख्या २०,००० पेक्षा जास्त नाही अशा गावात सुरु केलेला उद्योग, ज्यात उत्पादन अथवा सेवा या विजेंचा वापर करुन किंवा विजेशिवाय करण्यांत येतात व असा उद्योग ज्यामध्ये भांडवली गुंतवणुकीची (हत्यारे व औजारे,मशिनरी,शेड इमारतीवरील खर्चाची) रक्कम प्रति कारगिर किंवा कामगार रुपये ५०००/- पेक्षा जास्त असणार नाही.अश्या उद्योगास ग्रामोद्योग म्हणुन संबोधण्यात येते.

**पात्र लाभांर्थी:-**

१ वैयक्तिक उद्योजक/कारागिर

२. १८६० च्या सोसायटी नोंदणी कायदयान्वये रजिस्टर झालेल्या संस्था

३. १९६० च्या सहकार कायदयान्वये नोंदणी झालेल्या सहकारी सोसायटया

४. १९५० च्या सार्वजनिक विश्वस्त कायदयानुसार नोंदणी झालेल्या संस्था

# पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम ( पी. एम. जी. पी. )

मा. पंतप्रधान डॉ. मनमोहनसिंग यांनी १५ ऑगस्ट २००८ या भारतीय स्वातंत्र्यांच्या ६१ व्या वर्धापनदिनी सुक्ष्म, लघु व मध्यम उद्यम मंत्रालय, भारत सरकारतर्फे सूक्ष्म उद्यम उभारणीसाठी पहिल्या पिढीच्या उद्योजकांना सक्षम बनविणारी पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम ही नवी योजना जाहिर केली आहे.

जिल्हा उद्योग केंद्राकडे कार्यान्वित असलेली पंतप्रधान रोजगार निर्मिती योजना व खादी आयोगाची आर ई जी पी योजना या दोन्ही योजना एकत्रित करुन ही नवीन योजना कार्यान्वित करण्यांत आली आहे.

**अ) योजने अंतर्गत उद्योगाची व्याख्या :-**

खादी आयोगाने ठरविलेल्या नकारात्मक उद्योगाव्यतिरिक्त सर्व उद्योग या योजनेच्या लाभासाठी पात्र आहेत.

**नकारात्मक उद्योग यादी :**- मांस प्रक्रिया, कॅनींगशी संबंधित उद्योग बीडी, पान सिगार तंबाखू हॉटेल धाबा त्यामध्ये मद्य विक्री होते शेती पिके चहा कॉफी रबर शेती रेशीम हॉरिकल्चर फुलशेती पशुपालन कुक्कुट पालन इ.

**ब) ग्रामोद्योगाच्या कार्यक्षेत्राची गावाची, ग्रामीण भागाची व्याख्या :-**

महसुल दस्तऐवजात नमूद असलेले गांव म्हणून नोंद असलेले गांव २०००० चे आतील लोकसंख्या असलेले गांव शहर परंतु ज्याची लोकसंख्या २०००० चे आतील आहे असे गांव ग्रामीण भाग म्हणून वर्गीकरण करण्यांत आले असून यानुसार लाभ होण्यास योग्य आहे.

**क) लाभार्थीची पात्रता**

१) १८ वर्षावरील वैयकतीक व्यक्ती लाभार्थी राहिल
२) उत्पन्न मर्यादा लागू नाही.
३) कमीत कमी ७ वी पास पाच लाखाचे वरील प्रकरणासाठी
४) फक्त नवीन प्रोजेकटसाठी अर्थसहाय्य देण्यांत येईल. कार्यरत युनिटसला कोणतेही अर्थसहाय्य देण्यांत येणार नाही.
५) स्वयंसहाय्यता बचत गट पात्र आहे.
६) १८६० अन्वये स्थापन झालेली संस्था, विश्वस्त संस्था (धर्मादाय आयुक्त नोंदणीप्राप्त) १९६० अन्वये स्थापन सहकारी संस्था

**ड) पी एम ई जी पी अंतर्गत अर्थसहाय्याचे वर्गिकरण**

या योजने अंतर्गत उत्पादन उद्योगासाठी २५ लाख मर्यादा व सेवा उद्योगासाठी १० लाख कर्ज सहाय्य मर्यादा आहे. खाली दर्शविण्यांत आल्याप्रमाणे अर्थसहाय्य वर्गवारी आहे. या योजने अंतर्गत देण्यांत येणा-या मार्जिन मनीचा स्तर पुढील प्रमाणे असेल.

| पीएमईजीपी अंतर्गत लाभार्थीचे गट | उद्योजकाचा स्वतःचा सहभाग | मार्जिन मनीचे दर (प्रकल्प खर्चाचा) | |
|---|---|---|---|
| | | शहरी | ग्रामीण |
| १) सर्वसाधारण | १० टक्के | १५ टक्के | २५ टक्के |
| २) विशेष ( अनु.जाती/अनु.जमाती इतर मागासवर्गीय/महिला/माजी सैनिक/ शारिरीकदृष्टया अपंग/एनईआर/डोंगरी आणि सीमा भागातील धरुन | ५ टक्के | २५ टक्के | ३५ टक्के |

ही योजना जिल्हा उद्योग केंद्र, खादी व ग्रामोद्योग मंडळ व खादी ग्रामोद्योग आयोग या तिन्ही यंत्रणेमार्फत स्वतंत्रपणे राबविण्यांत येत आहे. मंडळाने पुढील पाच वर्षांचा कृती आराखडा तयार केलेला आहे. तो खालील प्रमाणे :-

**पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम**
**पुढील पाच वर्षाचे नियोजन कृती आराखडा**
**सन २००८-०९ ते २०१२-१३**

| **अ.क्र** | **वर्ष** | **प्रकल्प संख्या** | **प्रकल्प राशी रुपये कोटीत** | **अपेक्षित मार्जिन मनी रुपये कोटीत** | **अपेक्षित स्वयंरोजगार** | **अपेक्षित रोजगार** |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २००८-०९ | १६५८ | ८० | १९.८९ | १६५८ | १६५७३ |
| २ | २००९-१० | १९९० | ९६ | २३.८७ | १९९० | १९९०० |
| ३ | २०१०-११ | २३८८ | ११५ | २८.६६ | २३८८ | २३८८० |
| ४ | २०११-१२ | २८६६ | १३८ | ३३.३० | २८६६ | २८६६० |
| ५ | २०१२-१३ | ३३०० | १६५ | ३९.९६ | ३३०० | ३३३०० |
| | **एकूण** | **१२२०२** | **५९४** | **१४५.६८** | **१२२०२** | **१२२३१३** |

